विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) या कार्यालयासाठी सद्य:स्थितीत वापरात असलेल्या लेखाशीर्षामध्ये बदल करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
ज्ञापन क्रमांक : संकीर्ण:- २०२६/प्र.क्र.१७/(ई-नस्ती क्र.१७५५९१२)/आरक्षण-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ ऑक्टोबर, २०२६

संदर्भ:- १. महालेखाकार, मुंबई यांचे पत्र क्र.TM/CH-1/Budget scrutiny/२०२४-२५/२००, दि. १५ मे, २०२४.
२. वित्त विभागाचे पत्र क्र. संकीर्ण २०२४/प्र.क्र.४१/२०२४/अर्थ-१४, दि. २९ मे, २०२४.
३. महालेखाकार, मुंबई यांचे पत्र क्र.ख.वि./चा-५/सामान्य प्रशासन विभाग/यूओआर-१२९/२०२६-२७/११८८, दि. १८ सप्टेंबर, २०२६

प्रस्तावना:-

महालेखाकार, मुंबई कार्यालयाने संदर्भ क्र. १ येथील दि. १५ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये "८००-इतर जमा व खर्च" या गौणशीर्षाखालील उपशीर्षामध्ये अर्थसंकल्पित केलेल्या रकमांची यादी पाठविली होती. त्यानुषंगाने सदर यादीतील गौणशीर्षाचे पुनर्विलोकन करून शक्य असेल तेथे पर्यायी गौणशीर्ष सुचविण्याबाबत वित्त विभागाने सर्व प्रशासकीय विभागांना संदर्भ क्र. २ येथील दि. २९ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये सुचना दिल्या होत्या. सदर सुचनांनुसार या विभागाच्या अखत्यारितील विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) या कार्यालयासाठी मुख्य लेखाशीर्ष २०७० मधील "८०० इतर खर्च" या गौण शीर्षाऐवजी २०५२ मधील "०९२ इतर कार्यालये" या गौणशीर्षामध्ये नवीन लेखाशीर्ष तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्या अनुषंगाने वित्त विभागाकडून आणि महालेखाकार, मुंबई कार्यालयाकडून नवीन लेखाशीर्षास मान्यता प्राप्त करून घेण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) या कार्यालयासाठी सद्य:स्थितीत वापरात असलेल्या लेखाशीर्षामध्ये प्रस्तुत शासन निर्णयान्वये बदल करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) या कार्यालयासाठी महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या दिनांक १८.०९.२०२६ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार वित्त विभागाने नवीन गटशीर्षासह आठ अंकी सांकेतांक (CRC) उपलब्ध करुन दिला आहे.

२. वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) साठी सद्य:स्थितीत वापरात असलेल्या लेखाशीर्षामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यात येत आहे.

अ.क्र.	सध्याचे कार्यरत लेखाशीर्ष	वित्त विभागाकडून नव्याने प्रस्तावित लेखाशीर्ष
१.	मुख्य लेखाशीर्ष २०७०, इतर प्रशासनिक सेवा ८०० इतर खर्च (००)(००)(०६) विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) (अनिवार्य) (२०७००५८६)	२०५२, सचिवालयीन सर्वसाधारण सेवा (००) ०९२, इतर कार्यालये (०६) विभागीय आयुक्त (०१)विभागीय आयुक्तांची कार्यालये (मागासवर्ग कक्ष) (अनिवार्य) (२०५२५४७५)

३. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४५९/व्यय-४, दि. २९/०७/२०२६ अन्वये मिळालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६१०२९१६५६०८११०७ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Somnath Vasant Potare

Digitally signed by Somnath Vasant Potare
DN: c=IN, o=Personal, title=3713, pseudonym=0157e7ba82734d5b9b811ee2a3aa0831, 2.5.4.20=f1102a366925a0f9a9c6365ec74c409bec9089f7141be1444e643e87925744f9, postalCode=410206, st=Maharashtra, serialNumber=17e9c3c1ef20b007fefc5a1f1ec0e69f061648d4f897d5822e9f0e56899502e0, cn=Somnath Vasant Potare
Date: 2026.10.29 16:57:05 +05'30'

(सोमनाथ पोटरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग, अर्थसंकल्प-१४, मंत्रालय, मुंबई.
९. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (आरक्षण-३).